शेतीमालावर आधारीत सुक्ष्म, लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांना लागणाऱ्या पाण्याकरिता मानीव पाणी आरक्षणा बाबतची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक. संकिर्ण- २०१८/(३९/१८)/सिं.व्य.(धो)
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०७/०२/२०१८

<u>संदर्भ:</u> १) शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१५/(४४/१५)/सिंव्य (धोरण) दि. १७/११/२०१६

२) कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.कृप्रधो-२०१७/प्र.क्र.२०८/९-अे, दि.३१/१०/२०१७

<u>प्रस्तावना :-</u>

दिनांक २४ आक्टोबर, २०१७ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत " राज्याचे अन्न प्रक्रिया धोरण २०१७ लागू करणेबाबतच्या निर्णयात शेतमालावर आधारित सुक्ष्म, लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांना लागणाऱ्या पाण्याकरिता पाणी उपसा परवाना घेण्याची आवश्यकता राहणार नाही, असा नियम लागू करण्यात येणार आहे. परंतु मोठे उद्योग व मेगा फूडपार्ककरिता विहित मुदतीत निर्णय घेण्याची कायदेशीर तरतुद करण्यात येईल." असा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम १६ नुसार मा.मंत्रिमंडळ समितीला पाणी आरक्षणा संदर्भात पुर्ण अधिकार आहेत. त्यानुसार हे धोरण निश्चीत केले आहे. मंत्रीमंडळाच्या उक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता कृषी व पदुम विभागाने संदर्भ क्र. २ अन्वये शासन निर्णय निर्गमित केला आहे.

शेतीमालावर आधारीत सुक्ष्म, लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांना लागणाऱ्या पाणी पुरवण्याकरिता विलंब होऊ नये याकरीता घेण्यात आलेल्या उपरोक्त मंत्रीमंडळाच्या निर्णयाच्या अधीन राहून जलसंपदा विभागाकडील धरणातील पाणी साठयाचे योग्यरितीने नियोजन करणे शक्य व्हावे यासाठी आवश्यक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शेतीमालावर आधारीत सुक्ष्म, लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील पाणीसाठयाचा स्त्रोत म्हणून वापर करावयाचा असल्यास त्यासाठी जलसंपदा विभागाकडील पाणी आरक्षणाच्या मंजूरीची आवश्यकता राहणार नाही. सदर निर्णयाची अंमलबजावणी करताना खालील सूचनांचे पालन करण्यात यावे.

१. शेतीमालावर आधारीत सुक्ष्म, लघु व मध्यम अन्न प्रक्रिया योजनांसाठी विहित नमुन्यातील पाणी अर्ज संबंधीत अर्जदाराने/औद्योगीक संस्थेने/ कंपनीने यांनी प्रकल्पाचे संबंधित जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेकडे करणे आवश्यक राहील. (विहित नमुना पाणी अर्ज सोबत जोडले आहे.) पाणी अर्जातील माहिती अचूक असल्याबाबतची जबाबदारी संबंधीत औद्योगीक संस्था/ कंपनी यांची राहील. अर्जदाराने सदर अर्जाची पोहोच घ्यावी.

२. पाण्याचा उद्भव /स्त्रोत योग्य व पुरेसा असल्याबाबतची खात्री संबंधित अर्जदार/औद्योगीक संस्था/ कंपनी यांनी करावी. संबंधीत संस्थेस प्रकल्पस्थळी ९०%, ७५% व ५०% विश्वासार्थने उपलब्ध होणारा येवा व आतापर्यंत औद्योगीक व घरगुती आरक्षण, मागील १० वर्षात धरणात उपलब्ध महत्तम साठा (१५ आक्टोबर नुसार) इत्यादी माहिती कार्यकारी अभियंता यांनी लेखी कळवावी.

३. संबंधित अर्जदार/औद्योगीक संस्था/ कंपनी यांचे कडून प्रचलित औद्योगीक दराने पाणीपट्टी वसुली करावी. ज्या कार्यकारी अभियंता याच्याकडे पाणी अर्ज प्राप्त झाला असेल पण जर त्यांच्या अधिकार कक्षेत ही बाब नसेल तर त्याने ज्या कार्यकारी अभियंत्याकडे ही बाब आहे त्यांना अर्ज पाठवून संबंधित अर्जदार/औद्योगीक संस्था/ कंपनी यांना त्यांचेकडे अर्ज करण्याचे तात्काळ कळवावे.

४. विहित नमुन्यातील परिपूर्ण पाणी अर्ज कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग यांना प्राप्त झाल्याचा दिनांक (पोहोच पावतीचा दिनांक) हाच पाणी आरक्षण मंजूरीचा मानीव दिनांक असेल. तसेच ज्ञापन हा मानीव दिनांक नमूद करुन कार्यकारी अभियंता यांनी निर्गमित करावे. सदर कार्यवाही अर्ज पाप्त झाल्यापासून १५ दिवसात करावी.

५. हे आरक्षण जलाशयातुन थेट पाणी आरक्षणासाठीच लागू राहील. उद्योगाने नक्त पाणी वापर दिले असल्यास, त्यात प्रमाणशीर बाष्पीभवन व इतर तुट जलसंपदा विभागाने परिगणित करुन नक्त पाणी मागणीमध्ये याचा समावेश करुन एकूण वार्षिक पाणी आरक्षण ३० वर्षाकरिता मंजूर करावे ३० वर्षानंतर आवश्यकतेनुसार पुन्हा नुतीनकरण करण्याची अट नमूद करावी.

६. ज्ञापना नुसार विहित नमुन्यातील करारनामा संबंधित अर्जदार/औद्योगीक संस्था/ कंपनी व संबंधित कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग यांनी करावा.

७. ई-जलसेवा मधील जललेखा मध्ये पाणी आरक्षणाची नोंद घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता,जलसंपदा यांची राहील.

८. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे आदेश क्र.९/२०१७, दि.२२/०९/२०१७ मधील तरतुदी व त्यांनी वेळोवेळी निश्चीत केलेल निकष, आदेश व पाणीपट्टीचे दर संबंधित अर्जदार/ औद्योगीक संस्था/ कंपनी यांना बंधनकारक असतील.

९. सदरचे मानीव पाणी आरक्षण हे फक्त जलाशयातुन थेट उपसा करण्याकरिता लागू असतील. कालवे व जलप्रकल्प क्षेत्रातील वितरण व्यवस्था, नदीनाले यातुन उचल परवानासाठी प्रचलित पध्दतीचा अवलंब करावा लागेल.

१०. मोठे अन्न प्रक्रिया उद्योग व मेगाफुड पार्क करिता ४५ दिवसांचे आत पाणी आरक्षणाबाबत निर्णय घेण्यात येईल.

सदर शासन निर्णय कृषी व पदुम विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०७१५५४४३१९२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

C. A. Birajdar

Digitally signed by C. A. Birajdar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bf1b26f0a8f1d09e25cd9d6bf37b84d8e843d220d272af12bd94b7eee717c5fa, cn=C. A. Birajdar
Date: 2018.02.07 16:24:26 +05'30'

सहपत्र :- i) पाणी अर्जाचा विहित नमुना

(च. आ. बिराजदार)
सचिव (लाक्षेवि)

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
४. मा. सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
८. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
९. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
१०. अ.मु.स.(उद्योग), उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव पणन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४ सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
१५. सचिव (पदुम), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६.आयुक्त, कृषि, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७. कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ (सर्व)
१८. मुख्य अभियंता (पा) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, (सर्व)
२०. अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग (सर्व)
२१. निवडनस्ती कार्यासन सिंव्य (धोरण)

सेवा क्र. 8

औद्योगीक प्रयोजनासाठी पाणी वापर परवाना देणे.

दिनांक :- / /

प्रति,

मा. कार्यकारी अभियंता,

..............................,

....

विषय :- औद्योगीक प्रयोजनासाठी कायमस्वरुपी बिगर सिंचन पाणी आरक्षण मिळणेबाबत.

महोदय,

मौ. ....ता. ....जि. .... येथील गट क्र./स.क्र. .... मध्ये आमचा ....उद्योग प्रस्तावित / अस्तित्वात आहे. सदरील उद्योगासाठी खालील पैकी कोणत्याही प्रकल्पातून .... द.ल.घ.मी. औद्योगीक / पेय जल निर्मितीसाठी बिगरसिंचन आरक्षण आवश्यक आहे. सदरील आरक्षणाच्या अनुषंगाने आवश्यक माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

1) पाणी आरक्षण ज्या प्रकल्पातून आवश्यक आहे ते प्राधान्यक्रमाने अ) ....

ब) ....

क) ....

2) या पूर्वी बिगर सिंचन पाणी आरक्षण मंजूर असल्यास त्याचा तपशील ....

3) नियोजीत उत्पादन व नियोजीत उत्पादन क्षमता प्रती वर्ष खालील प्रमाणे

अ.क्र.	प्रस्तावित/सद्यस्थितीत उत्पादनाचे नांव	उत्पादनाचे परिमाण प्रती वर्ष मे. टन.
1	....	....
2	....	....
3	....	....
4	....	....

4) पाणीवापर टप्प्यात आवश्यक आहे काय ? होय/नाही

5) पाणीवापर टप्प्याने आवश्यक असल्यास टप्पा निहाय मागणी

अ) सन .... ते सन...........पर्यंत ....दलघमी

ब) सन .... ते सन...........पर्यंत ....दलघमी

क) सन .... ते सन...........पर्यंत ....दलघमी

६) सांडपाण्यावर प्रक्रियाकरुन पुनर्वापर करण्याचे नियोजन आहे काय ? होय/नाही

७) पुनर्वापर प्रस्तावित असल्यास पुनर्वापरातुन उपलब्ध होणारे पाणी ....दलघमी.

८) सद्यस्थितीत पाणी पुरवठ्यासाठी उपलब्ध असलेला उदभव .... भूगर्भातून/विहिरीतून/अस्तित्वातील योजनेतून इ.

९) सद्यस्थितीत उपलब्ध असलेला वार्षिक वापरासाठी पाणी साठा ....दलघमी

१०) भविष्यात जलसंवर्धनातून अथवा कार्यान्वित नसलेल्या योजना पुर्नजिवीत करुन उपलब्ध होउ शकणारा पाणी साठा (वार्षिक) ....दलघमी.

११) रेन वॉटर हार्वेस्टींगचा कायदा लागु आहे काय? होय/नाही.

१२) संपर्कासाठी पत्ता अ) मु.पो.................. ता............... जि.............

ब) पिन कोड ....

क) दुरध्वनी क्र. ....

ड) भ्रमणध्वनी क्र. ………………………

इ) ई मेल ……………………….

तरी उपरोक्त पैकी कोणत्याही एका प्रकल्पातून वार्षिक .... द.ल.घ.मी. औद्योगीक /पेयजल निर्मिती वापरासाठी कायमस्वरूपी बिगर सिंचन आरक्षण मंजूर करण्यात यावे हि विनंती. सोबत जोडावयाचे प्रमाणपत्राची यादी जोडली आहे.

सोबत :- १) संस्था नोंदणी प्रमाणपत्र,

२) योजनेचा नकाशा,

३) पाईपलाईन संरेखा नकाशा,

४) ७/१२ चा उतारे,

५) उद्योग सुरु करण्याचे प्रमाणपत्र

६) महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे कंसेन्ट टू एस्टॅब्लीश/पर्यावरण प्रमाणपत्र/हमीपत्र,

७) सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा आराखडा व नकाशा,

८)सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याचे हमीपत्र,

आपला /आपली विश्वासू,

सही

(प्राधिकृत स्वाक्षरीकाराचे नांव)

सेवा क्र. 8 (हमीपत्र)

<u>औद्योगीक प्रयोजनासाठी पाणी वापर परवाना देणे.</u>

हमीपत्र लिहुन घेणार - कार्यकारी अभियंता,

………………………………….

………………………………….

हमीपत्र लिहुन देणार - ………………………………….

………………………………….

हमीपत्र लिहुन देण्यात येते की, आम्हास……………………...नदी/बंधारा/जलाशय/विहिर/कालवा मधुन बिगर सिंचन आरक्षण आवश्यक असून त्यासाठीचा प्रस्ताव आपल्या कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. या अनुषंगाने आम्ही खालिल प्रमाणे हमी देत आहोत.

१. आरक्षण प्रस्तावीत केलेल्या प्रकल्पात/नदीत/कालव्यात/जलाशयात कोणत्याही कारणांमुळे पाणी कमी झाल्यास आम्ही आमच्यासाठी उर्ध्व बाजुच्या धरणातुन/जलाशयातुन पाणी सोडण्याची मागणी करणार नाहीत व या बाबत कोणतीही तक्रार करणार नाही.

२. प्रत्यक्षात पाणी वापर सुरु करणेपुर्वी पाणी वापर मोजणीसाठी प्रमाणीत इलेक्ट्रॅानिक मीटर बसवीण्यात येईल.

३. पाणी वापर फक्त परवानगी दिलेल्या प्रयोजनासाठीच करण्यात येईल.

४. उन्हाळ्यात पाणी उपलब्धता कमी होण्याची शक्यता असल्याने ४ महिने पुरेल एवढ्या क्षमतेचा साठवण तलाव/पाण्याची टाकी बांधण्यात येईल.

५. सिंचन कपात करुन आरक्षण मंजूर केल्यास शासनाच्या प्रचलित नियमानुसार देय होणारा सिंचन पुनर्स्थापना खर्च भरण्यास आमची तयारी आहे.

६. भांडवली खर्चाची मागणी करण्यात आल्यास ती भरण्यास आम्ही तयार आहोत/नाही.

७. अधीसुचीत नदी/नाले/ओढे वा जलाशयात दुषीत पाणी सोडले जाणार नाही व जल प्रदुषण होणार नाही याची सर्व खबरदारी घेण्यात येईल.

८. सांडपाण्यावर प्रक्रीया करणारी यंत्रणा उभारुन शक्य तेवढ्या पाण्याचा पुनर्वापर करण्यात येईल.

९. पाणी वापराची पाणीपट्टी आकारणी देयके विहित कालमर्यादेत भरणा करण्यात येतील.

१०. आरक्षण मंजुर होताच इरादा पत्र प्राप्त झाल्यावर तिन महिन्याच्या आत बिगर सिंचन पाणी वापरा बाबत विहित करारनामा करण्यात येईल.

११. वेळोवेळी निर्गमित होणारे शासनाचे सर्व नियम अटींचे पालन करणे बंधनकारक असेल.

१२. शासनाच्या कोणत्याही नियमाचे अथवा अटीचे उल्लंघन झाल्यास जलसंपदा विभागातर्फे पाणी पुरवठा खंडीत केल्यास कोणतीही तक्रार करणार नाही किंवा कोणतीही नुकसान भरपाई मागणार नाही.

आमच्या तर्फे सदरचे हमी पत्र आज दि…../…../………. रोजी लिहुन देण्यात येत आहे.

साक्षीदार - हमीपत्र लिहुन देणार

१) ………………………………….. सही

सही

नांव ……………………….

५) …………………………………… सही ………………………………………